केंद्र शासनाच्या त्रिभाषासूत्रानुसार
केंद्र शासनाच्या कार्यालयामधून/
प्राधिकरणामधून मराठीचा वापर करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक क्रमांक : मभाषा-१०९१/१२८/२०७,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १० मे, १९९१

परिपत्रक :- महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ च्या तरतुदीनुसार दिनांक १ मे, १९६६ पासून वर्जित प्रयोजने वगळता अन्य सर्व शासकीय कामकाज मराठीतून करण्याबाबत व त्याची अंमलबजावणी काटेकोरपणे व्हावी याविषयी शासनाने वेळोवेळी परिपत्रके काढून मार्गदर्शन केलेले आहे. प्रशासकीय कामकाजामध्ये मराठीचा जास्तीत जास्त वापर होणे हे सामान्य माणसाच्या हिताचे व शासन अधिक लोकाभिमुख होण्याच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. केंद्र शासनाच्या त्रिभाषासूत्रानुसार महाराष्ट्रातील केंद्र शासनाच्या कार्यालयातून जनतेला माहिती मिळावी म्हणून हिंदी व इंग्रजी भाषेसह मराठीचा वापर करावा असे केंद्र शासनाचे दिनांक १८-१-७७ व दिनांक २९-३-८१ रोजीचे आदेश आहेत. (प्रती सोबत जोडल्या आहेत.) व त्यांनी त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयांना तसे कळविले आहे. तथापि त्याची अंमलबजावणी केंद्र शासनाच्या कार्यालयामधून/प्राधिकरणामधून केली जात नाही अशा तऱ्हेच्या तक्रारी शासनाकडे विधीमंडळ सदस्यांकडून आलेल्या आहेत. तेव्हा शासनाच्या मराठीकरणाच्या धोरणानुसार व केंद्र शासनाच्या त्रिभाषा सूत्रानुसार केंद्र शासनाच्या कार्यालयामधून / प्राधिकरणांमधून जनतेच्या माहितीसाठी नामफलक, सूचनाफलक यावर हिंदी व इंग्रजी भाषेसह मराठी भाषेचा वापर केला जातो किंवा नाही हे पहाण्याचे काम व वापर केला जात नसल्यास, सदर कार्यालयाकडे त्याचा पाठपुरावा करण्याचे काम जिल्हाधिकारी यांच्याकडे सोपविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. तरी जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या जिल्हांतर्गत केंद्र शासनाची जी कार्यालये/प्राधिकरणे आहेत त्यामधून त्रिभाषा सूत्रानुसार मराठी भाषेचा आवश्यक तो वापर केला जातो किंवा कसे हे तात्काळ जाणून घ्यावे व आवश्यकता भासल्यास, मराठी भाषेचा वापर करण्याविषयी संबंधित कार्यालये/प्राधिकरणे यांना कळवावे.

.....२

९. जिल्हाधिकाऱ्यांनी पाहणी केलेल्या कार्यपाहणीचा अहवाल शासनास सत्वर सादर करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/-

(अ. म. आम्बेरकर)

शासनाचे उपसचिव.

सोबत :– ८ शासनाच्या आदेशाच्या प्रती.

प्रत,

सर्व विभागीय आयुक्त,

सर्व जिल्हाधिकारी व अपर जिल्हाधिकारी

भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई

निवड नस्ती.

सो-१८-१.